# - हितगुज -

हितगुज! कशाला म्हणायचं हितगुज तर कधीतरी मैत्रिणींबरोबर केलेल्या गुजगोष्टी, कानगोष्टी. मग कधी मैत्रिण तर कधी शेजारीण किंवा बहीण अथवा लाडकी लेक. आई कोणीही असो.

या गुजगोष्टींसाठी विषय अनंत. बालपण, शालेय शिक्षण, तरुणपणीचं वेगळंच, तर कधी संसारातली सुख दुःख, प्रवास वगैरे वगैरे.

तशा आम्ही रोजच संध्याकाळी भेटतो. तास दीड तास मनसोक्त गप्पा करतो. कंटाळवाणी संध्याकाळ गप्पांमध्ये केव्हांच सरते. विषय वैविध्य वर सांगितलंच. ज्या नोकरी, संसार करून कृतकृत्य झाल्या आहेत. निवृत्तीचा काळ मजेत घालवतात त्यांच्या गोष्टी वेगळ्याच ज्या गृहिणीच राहिल्या त्यांच्या गोष्टी वेगळ्याच त्या सुध्दा निवृत्तच पण तरीही संसाराच्या रामरगाड्यात अडकलेल्याच.

तिन्हीसांजा झाल्या की सगळ्यांना घरी जायचे वेध लागतात. मग त्या रंगात आलेल्या गप्पांना फाटा देऊन जावच लागतं. कारण ते सातच्या आत घरात निवृत्तांसाठीच आहे ना! उगाच रस्त्यात अंधारात पडू नये म्हणून बर का! घरी गेल्यावर वेळ पडली तर (चुलत सासूची सेवा) स्वयंपाका कडे पाहायचं. नातवंड जवायची असतात सून मुलगा ऑफीसमधून उशीरा येणार असतात. कारणं अनेक. घरोघरी त्याच परी, दुसरं काय!

एकदा आम्ही ठरवलं आपण सगळ्या मैत्रिणी एक दिवसाच्या ट्रीपला जाऊया. हो ना करता करता रिसॉर्टला जायचं ठरलं. बरोबर काही न्यायचं नाही. रिसॉर्ट मध्ये सकाळी चहा, न्याहारी. दुपारी मस्त जेवण. संध्याकाळी परत चहा. आणि रात्री जेवण. आम्ही एक रात्र मुक्काम करण्याचं ठरवलं होतं. असं सगळं ठरल्यावर. आमच्या

आनंदाला उधाण आलं. घरातून निघाल्यापासून गप्पा, गाणी, जुन्या कविता यांना ऊत आला होता. रिसॉर्ट मध्ये झोपाळे वगैरे होते झोपाळ्यांवर बसून उंच उंच पण जरा (बेतानेच हं!) झोके घेतले. बालपणीची आठवण आली.

दिवसभर आजूबाजूला फिरून निसर्गाशी सान्निध्य साधलं नुकता पावसाळा संपला असल्याने निसर्ग सौंदर्य अवर्णनीय होतं. भरपूर फिरले. मग संध्याकाळी हॉल मध्ये जमलो तिथेही पत्ते कॅरम, गाणी गोष्टी अखंड चालूच. नंतर गरमा गरम जेवण जे गृहिणीला कधीच नसतं कारण ती गृहिणीच तिला घरातील इतर सदस्यांना गरम गरम वाढण्यातच धन्यता वाटते.

तर असा एकत्रीत दिवस खूप मजेत गेला रात्री झोपतांना गप्पा करता करता अर्धी रात्र सरली मग झोपले पण सकाळी उठल्यावर मात्र सगळ्यांनाच घर दिसू लागलं. स्त्रीच ती. शेवटी गृहकृत्यदक्ष गृहिणीचे कुठेही गेली तरी रममाण होणार तिच्या गृहराज्यातच. असो.

आशा पावगी
"आनंदवन", B-1
वृंदावन कॉम्प्लेक्स
डी. पी. रोड
कोथरूड. पुणे.



